# आगरवाडाचा पिनकोड बदलास तात्पुरती स्थगिती

## नागरिक समितीच्या लढ्याला आले यश : विभागीय पोस्टमास्टरांचे वेधले लक्ष

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १ :** पेडणे पोस्ट कार्यालय यापूर्वी येणारे आगरवाडा चोपडे पंचायतक्षेत्र शिवोली पोस्ट कार्यालयाला जोडण्याबरोबर या पूर्वीच्या ४०३५१२ या पिनकोड मध्ये बदल करून त्या जागी ४०३५१७ असा बदल करण्याच्या पोस्ट खात्याच्या निर्णयाविरोधात आगरवाडा चोपडे नागरिक समितीने केलेल्या आंदोलनाला अखेर यश आले आहे. शुक्रवारी त्यांनी पणजी येथील गोवा विभागीय पोस्ट मास्टर जनरल आर. आर. पाटील यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर करून लोकांना वेठीस धरण्याचा हा निर्णय रद्द करण्याची मागणी केली होती, त्या मागणीचा सहानुभूती पूर्वक विचार करून त्यांनी हा निर्णय तात्पुरता स्थगित करण्याचा आदेश पोस्ट खात्याच्या अधिकाऱ्यांना दिला. श्री. पाटील यांनी त्यांच्या भेटीस गेलेल्या आगरवाडा चोपडे नागरिक समितीच्या शिष्टमंडळाचे म्हणणे एकूण घेतले. त्यानंतर त्यांनी या मंडळाला पुढील निर्णय होईपर्यंत यापूर्वीचा निर्णय स्थगित ठेवण्याचे स्पष्ट आश्वासन दिल्याचे आगरवाडा चोपडे नागरिक समितीचे अध्यक्ष विवेक गावकर यांनी सांगितले. आगरवाडा चोपडे पंचायतीचे सरपंच हेमंत चोपडेकर, माजी सरपंच तथा विद्यमान पंच सचिन राऊत, माजी सरपंच तथा विद्यमान पंच अँथनी फर्नांडिस , सीताराम परब आदींचा समावेश होता.



पणजी : येथील गोवा विभागीय पोस्टमास्टर जनरल आर. आर. पाटील यांना निवेदन सादर करताना सरपंच हेमंत चोपडेकर, पंच सचिन राऊत, पंच अँथनी फर्नांडिस, अध्यक्ष विवेक गावकर, सीताराम परब व इतर.

तत्पूर्वी, गुरुवारी आगरवाडा चोपडे नागरिक समितीने पंचायतक्षेत्रातील नागरिकांची बैठक घेऊन त्यात पोस्ट खात्याच्या या निर्णयाविरुद्ध आवाज उठवण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार त्यांनी प्रथम आगरवाडा चोपडे पोस्ट कार्यालय, पेडणे पोस्ट कार्यालय ,पेडणे तालुका उपजिल्हाधिकारी कार्यालय, मामलेदार कार्यालयात निवेदने सादर करून हा निर्णय रद्द करण्याची मागणी केली होती. त्यानुसार आज पोस्टमास्टर जनरलच्या पणजी येथील कार्यालयात गोवा विभागीय पोस्टमास्टर जनरल आर. आर. पाटील यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करून त्यांना निवेदन सादर केले होते. यावेळी त्यांनी पोस्ट खात्याने घेतलेल्या निर्णयाला स्थगिती देण्याचे आश्वासन दिले. आगरवाडा चोपडे येथून शिवोली पोस्ट कार्यालय जवळ असल्याचे पोष्टाची डिलिव्हरी लवकर होण्यासाठी हा निर्णय घेतला होता. मात्र, त्यामुळे येथील नागरिकांना त्रास होणार असेल तर आम्ही हा बदल रद्द करीत आहोत, असे सांगितल्याचे आगरवाडा चोपडेतील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

आगरवाडा चोपडे नागरिक समितीने याबाबत घेतलेल्या निर्णयाचे स्वागत केले आहे. मात्र पिन कोड बदलाचा निर्णय कायम स्वरुपी होईपर्यंत पाठपुरावा करण्याचे ठरवले आहे.

दरम्यान, शुक्रवारी झालेल्या पंचायतीच्या बैठकीत याबाबत चर्चा होऊन हा पिनकोड बदलाचा निर्णय रद्द करण्याचा ठराव मंजूर केला. या निर्णयाच्या प्रती केंद्रीय मंत्री तथा उत्तरगोवा खासदार श्रीपाद नाईक तसेच राज्य सभा खासदार सदानंद शेट तानावडे यांना पाठवण्यात आल्या आहेत.

दरम्यान, आगरवाडा चोपडे नागरिक समितीच्या या कार्याला नागरिकांनी मोठ्या संख्येने पाठिंबा दिल्याने हा लढ्यात आम्हाला प्राथमिक यश मिळाल्याचे सरपंच हेमंत चोपडेकर यांनी सांगितले.

पान १ वरून

### अर्थसंकल्प निवडणूक केंद्रित असल्याची विरोधकांची टीका

काँग्रेस खासदार कार्ती चिदंबरम् यांनी अर्थसंकल्प साजरा करण्यापूर्वी सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला. त्यांनी निदर्शनास आणून दिले की मागील अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या अनेक योजना प्रभावीपणे अंमलात आणल्या गेल्या नाहीत आणि नव्याने जाहीर केलेल्या योजनांचेही असेच भवितव्य होईल का असा प्रश्न उपस्थित केला.

काँग्रेस नेत्या कुमारी शैलजा यांनी भाजपवर बिहार आणि दिल्लीतील आगामी निवडणुकांनुसार अर्थसंकल्प तयार केल्याचा आरोप केला. त्यांनी असा दावा केला की अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी किमान आधारभूत किंमत, अणुऊर्जा प्रकल्प, गरिबांसाठी घरे आणि मनरेगासारख्या रोजगार योजना यासारख्या महत्त्वाच्या राष्ट्रीय मुद्द्यांकडे दुर्लक्ष केले गेले आहे.

द्रमुक खासदार दयानिधी मारन यांनी दिल्ली निवडणुकीपूर्वी मतदारांना आकर्षित करण्याचा दिशाभूल करणारा प्रयत्न म्हणून अर्थसंकल्प फेटाळून लावला. त्यांनी अर्थसंकल्प गुंतागुंतीचा आणि अस्पष्ट असल्याची टीका केली आणि म्हटले की मध्यमवर्गीय करदात्यांना टीडीएस कपातीसारख्या तांत्रिक बाबींमुळे वचन दिल्याप्रमाणे प्रत्यक्षात फायदा होणार नाही.

## लझिज सीक्यूएस, सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्स विजयी




■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १ :** गोवा जीएसबी स्पोर्ट्‌स् अँड चॅरिटेबल ट्रस्टने गोवा सारस्वत समाज यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या आल्कॉन जीएसबी युनिटी कप टी–२० क्रिकेट स्पर्धेत शनिवारी झालेल्या सामन्यांमध्ये लझिज सीक्यूएसने मडगाव रॉयल्सचा २ गडी राखून व सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्सने म्हापसा ड्रीम क्रशर्स यूसीचा ५ गडी राखून पराभव केला. दिवसातील पहिल्या सामन्यात मडगाव रॉयल्सने प्रथम फलंदाजी करताना ५ बाद १५३ धावा केल्या. लझिज सीक्यूएसने ८ बाद १५४ धावा करताना शेवटच्या चेंडूवर विजय प्राप्त केला. दुसऱ्या सामन्यात म्हापसा ड्रीम क्रशर्सने २० षटकांत ८ बाद १३४ धावा केल्या. सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्स १७.२ षटकांत ५ बाद १३५ धावा करताना विजय संपादन केला. मडगावच्या एमसीसी मैदानावर हे दोन्ही सामने झाले.

सकाळच्या सत्रातील सामन्यात लझिजने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी निवडली. मडगाव रॉयल्सकडून सनत प्रभुदेसाई याने सर्वाधिक ४० धावा केल्या. साहीश म्हांबरेने ३५ व दामोदर पै पाटणेकरने ३६ धावांचे योगजान दिले. प्रत्युत्तरादाखल खेळताना लझिजचा डाव ७ बाद १०५ असा चाचपडत होता. रावजी काकोडकर (२१ चेंडूंत ३४) व सर्वेश प्रभुगावकर (१५ चेंडूंत नाबाद ३५) यांनी या थरारक लढतीत संघाला विजय मिळवून दिला. सर्वेश प्रभुगावकर याला सामनावीर पुरस्कार प्राप्त झाला.

दुपारच्या सत्रातील सामन्यात म्हापसा ड्रीम क्रशर्सने नाणेफेक जिंकून फलंदाजी निवडली. परंतु, त्यांना अपेक्षित धावसंख्या उभारता आली नाही. त्यांच्या पंकज नाईकने सर्वाधिक ३० धावा केल्या. परंतु, यासाठी त्याने ३६ चेंडूंचा सामना केला. मेगा स्ट्रायकर्सच्या गोलंदाजांनी भेदक मारा केला. मेगा स्ट्रायकर्सने यानंतर सिद्धित रायतुरकर (४० धावा, ४८ चेंडू) व आदित्य आंगले (३१ धावा, २८ चेंडू) यांच्या जोरावर विजयाला गवसणी घातली. १९ धावांत २ गडी बाद केल्यानंतर केवळ ७ चेंडूंत २३ धावा केलेला दुर्गेश प्रभुगावकर सामनावीर ठरला.

**संक्षिप्त धावफलक**


मडगाव रॉयल्स – २० षटकांत ५ बाद १५३ (सनत प्रभुदेसाई ४०, दामोदर पै पाटणेकर ३६, साहीश महांबरे ३५, विक्रम गायतोंडे १३, निखिल विर्जिनकर २९–१, वसंत करमली २४–१, ईशान होडारकर १९–१) पराभूत वि. लझिज सीक्यूएस – २० षटकांत ८ बाद १५४ (सर्वेश प्रभुगावकर नाबाद ३५, रावजी काकोडकर ३४, लक्ष्मीकांत कुराडे २६, देवल करमली १८, सिद्धेश देसाई १९–३, कार्तिक हट्टंगडी १५–१, विक्रम गायतोंडे २३–१, विशाख तालक १६–१)

म्हापसा ड्रीम क्रशर्स – २० षटकांत ८ बाद १३४ (पंकज नाईक ३०, स्मित दळवी १८, राजाराम कुंडईकर १५, दुर्गेश प्रभुगावकर १९–२, सिद्धेश प्रभू अळवेणकर २५–१, आदित्य आंगले २१–१, आदित्य प्रभुगावकर १४–१, रौनक नारगुंडकर ७–१) पराभूत वि. सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्स – १७.२ षटकांत ५ बाद १३५ (सिद्धित रायतुरकर नाबाद ४०, आदित्य आंगले ३१, दुर्गेश प्रभुगावकर २३, आदित्य प्रभुगावकर १४, राजाराम कुंडईकर ३०–३, महेश चुरी २१–१, विपुल देशप्रभू २१–१) .

## मेरशी येथील स्वामी समर्थ मंदिरात आज 'सांज सुराची' कार्यक्रम



मुक्ता मिसर



तेजस वेर्णेकर



मैत्री नाईक

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १ :** मेरशी येथील श्री स्वामी समर्थ मंदिराचा २३ वा वर्धापनदिन सोहळा ३० जानेवारीला सुरू झाला आहे व २ रोजीपर्यंत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनिशी साजरा होणार आहे. शनिवार दि. १ रोजी सकाळी ६ ते ७ श्रीच्या पादुकांवर अभिषेक, ७ ते ९ पर्यंत श्री गुरुचरित्र पारायण, सकाळी ८ ते दुपारी १२.३० पर्यंत लघुरुद्र स्वाहाकार अनुष्ठान त्यानंतर आरती , तीर्थप्रसाद, संध्याकाळी भजन, ७.३० वाजता आरती, पालखी मिरवणूक व नंतर तीर्थ प्रसाद होईल.

रविवार दि. २ रोजी सकाळी ६ ते ७ श्रीच्या पादुकांवर अभिषेक,९ ते दुपारी १२.३० गावातून पालखी मिरवणूक व दरम्यान मंदिरात श्री. स्वामी चरित्र पारायण, दुपारी साडे बारा वाजता प.पु.अण्णा महाराज यांच्या पादुकांचे पूजन, नैवेद्य, आरती, दुपारी दीड ते साडे तीन पर्यंत महाप्रसाद, संध्याकाळी ५ ते ७ पर्यंत निषाद क्रिएशन निर्मित 'सांज सुरांची' हा विशेष कार्यक्रम होईल. यात तेजस वेर्णेकर, मुक्ता मिसर व मैत्री नाईक हे युवा कलाकार भाव,भक्ती व नाट्यगीते सादर करतील. त्यांना नितीन कोरगावकर (तबला), बाळकृष्ण मेस्त (सिंथेसायझर) व अश्विन जाधव (ऑक्टोपॅड) हे साथसंगत करतील. समृध्दी गणपुले हिचे निवेदन असेल. या कार्यक्रमाचालाभ घ्यावा असे आवाहन स्वामी समर्थ सेवा मंडळाने केले आहे.

## भूगोलामुळे जागतिक आव्हाने समजतात..!

### प्राचार्य नामदेव गावस; साखळी सरकारी महाविद्यालयात भूगोल दिन उत्साहात




साखळी : यंग जिओ माईंड २०२५ निमित्त मंचावर उपस्थित प्रमुख पाहुणे आणि प्राचार्य डॉ. नामदेव गावस, आयक्यूएसीचे संचालक डॉ. वैभव चिंदरकर, भूगोल विभागाच्या प्रमुख आणि कार्यक्रमाच्या मुख्य समन्वयक डॉ.आरती पानशेकर.

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १ :** भूगोलामुळे जागतिक आव्हाने समजून घेता येतात. अशा आव्हानांना तोंड देण्यात भूगोल विषय नेहमीच मार्गदर्शकाच्या भूमिकेत राहिलेला आहे, असे प्रतिपादन कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय साखळीचे प्राचार्य नामदेव गावस यांनी केले. ते भूगोल विभागातर्फे दि. १४ जानेवारी रोजी भूगोल दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या यंग जिओ माईंड २०२५ या कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्रात बोलत होते. यावेळी आयक्यूएसीचे संचालक डॉ. वैभव चिंदरकर, भूगोल विभागाच्या प्रमुख डॉ. आरती पानशेकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात बीए भाग तीनच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वागत गीताने झाली. त्यानंतर आयक्यूएसीचे संचालक डॉ. वैभव चिंदरकर यांचे मनोगत झाले. त्यांनी आपल्या मनोगतात सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता असलेल्या जबाबदा्या आणि उद्दिष्टांवर भर दिला. त्यानंतर कार्यक्रमाच्या मुख्य समन्वयक डॉ. आरती पानशेकर यांचे मनोगत झाले. त्यांनी जागतिक स्तरावर भूगोल दिन कसा साजरा केला जातो हे सांगताना या दिवसाचे भौगोलिक आणि सांस्कृतिक महत्त्व आपल्या मनोगतात अधोरेखित केले. अफिना बेग यांनी सूत्रसंचालन केले. तर आभार विशाल गावकर यांनी मानले.

> **भूगोल विभागाचा स्तुत्य उपक्रम**
>
> प्राचार्य डॉ.नामदेव गावस म्हणाले की, भूगोल विभागाने नेहमीच नाविन्यपूर्ण कार्यक्रमांची आखणी केली असून महाविद्यालयाच्या वाटचालीत भूगोल विभागाचे योगदान मोलाचे राहिलेले आहे.

> **यंग जिओ माईंडला उत्स्फूर्त प्रतिसाद**
>
> भूगोल दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या यंग जिओ माईंडला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या निमित्त आयोजित विविध स्पर्धांमध्ये १११ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या दिनानिमित्त व्हिज्युएल वाईब्स, थिनस्फेअर, गोवन फिएस्टा, जिगसॉ पझल, रॉक द ब्रश आणि एथनिक एलिगन्स या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते. कार्यक्रमाचा शेवट भौगोलिक विषयाला अनुरूप फॅशन शोने झाला.

## केरी न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ८ रोजी पं. पलूस्कर संगीत संमेलन

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १ :** केरी तेरेखोल परिसर विकास, कल्याण आणि शिक्षण संस्था संचालित अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रामार्फत शनिवार दि ८ रोजी दुपारी ४ वाजता पं. पलूस्कर संगीत संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

केरी पेडणे येथील न्यू इंग्लिश हायस्कुलच्या सभागृहात हे संमेलन होणार असून उदघाटन प्रसंगी अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाचे अखिल विश्व गांधर्व परीक्षा प्रमुख पं. रामराव नायक, गोमंतकाचे प्रथितयश चित्रकार, वक्ते संजय हरमलकर यांची विशेष उपस्थिती असणार आहे.

## दर्जेदार कविता लिहिण्याचा प्रयत्न करा : पाडलोस्कर



नावेली : काव्यमैफल सहभागी झालेले सदस्य.

### अशोक बोरकर काव्यमैफल रंगली

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १ :** संख्यात्मक वाढ करण्यावर भर न देता दर्जेदार कविता लिहिण्याचा प्रयत्न करावा. स्वत: प्रयत्नशील राहून इतर कवितांच्या कवितांचा सखोल अभ्यास करून स्वत:च्या कवितांचा स्तर वाढवावा, असे मत कवी दयाराम पाडलोस्कर यांनी बहुभाषिक अशोक बोरकर : काव्यमैफलच्या २३५ वा कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना काढले.

यावेळी व्यासपीठावर काव्यमैफलच्या संस्थापिका कविता बोरकर यांची उपस्थिती होती. मकरसंक्रांत सणा निमित्त या कार्यक्रमाचे खास आयोजन करण्यात आले होते.

या काव्यमैफलीत दिलखुलास वातावरणात कवींनी आपल्या कविता सादर केल्या. चौकार कवीचा या नवीन उपक्रमात कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे दयाराम पाडलोस्कर यांनी प्रचंड ताकदीच्या आणि गावरान सुगंधाच्या कविता सादर केल्या. यावेळेस त्यांनी आपला साहित्य प्रवास कसा घडला हे आपल्या भाषणात सांगितले.सुरवातीला कविता बोरकर लिखित पतंग उडवू चला .. हे गाणे उषा कामत, शर्मिला प्रभू, रेशम झारापकर, प्रमिला बोरकर, स्मिता तिंबलो यांनी सादर केले. तबल्यावर प्रथन सावंत, ऑर्गन वर प्रसाद सावंत, घुमटावर विश्वनाथ स्वार यांनी साथ दिली.स्वागत स्नेहा केणी यांनी केले. सूत्रसंचालन वैशाली व्हरखट यांनी केले. आभार शर्मिला प्रभू यांनी मानले.

## वन प्राथमिक विद्यालयात स्नेहसंमेलन, बक्षीस वितरण

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. १ :** सरकारी प्राथमिक शाळा – वनचे स्नेहसंमेलन व बक्षीस वितरणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा झाला.

मान्यवरांच्या उपस्थितीत प्रिया शेठ याच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून प्रिया प्रेमेंद्र शेठ (मये मतदारसंघाचे आमदार प्रेमेंद्र विष्णू शेठ यांच्या सौभाग्यवती व उद्योजिका), सन्मानि अतिथी रंजना पवार ( रावजी राणे मेमोरियल हायस्कूल – मावळिंगेच्या मुख्याध्यापिका), निमंत्रित गावच्या सरपंच दिया गावकर, उपसरपंच व गावचे पंच तुळशीदास चिबडे, निवृत्त शिक्षक मंगलदास चिबडे, पालक शिक्षक संघाच्या अध्यक्ष स्मिता नाईक, शाळेच्या मुख्याध्यापिका बिजल गावस, उपस्थित होत्या.




वन : येथील प्राथमिक विद्यालयाच्या बक्षिस वितरण समारंभात आदर्श विद्यार्थिनी म्हणून साची गावकर हिला सन्मानित करताना प्रिया शेठ. सोबत सविता गवस, रंजना पवार, दिया गावकर व मुख्याध्यापिका बिजल गावस.

यावेळी शाळेच्या माजी शिक्षिका स्मिता कळंगुटकर व सविता गवस यांचा सत्कार करण्यात आला.

स्नेहसंमेलनाला मदत करणाऱ्या पालक व ग्रामस्थांचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात महिला पालक वर्गाच्या स्वागत गीताने झाली. आदर्श विद्यार्थिनी म्हणून साची सतीश गावकर हिची निवड करून सन्मानित करण्यात आली. प्रमुख पाहुण्या प्रिया शेठ यांनी मोबाईलचे होणारे दुष्परिणाम याच्यावर मार्गदर्शन पालकांना केले. पालकाने मुलांबरोबर वेळ घालवावा अशे पालकांना आवाहन केले. आदर्श विद्यार्थी घडवण्यासाठी शाळेचा तसेच पालकांचा महत्त्वाचा वाटा असतो, असे रंजना पवार म्हणाल्या. मुख्याध्यापिका बिजल गवसने शाळेचा वार्षिक अहवालन सादर केला. पालक यशवंत सातार्डेकर ने आपले मनोगत व्यक्त केले. रिया वैजे हिने संपूर्ण सांस्कृतीक कार्यक्रम बसवण्यास शाळेला मदत केली. वन शाळेत पहिल्यांदाच संपूर्ण संस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या मुलानेच केले म्हणून गावकऱ्यांकडून त्यांचे कौतुक करण्यात आले. त्यात सहभागी झालेले विद्यार्थी अर्णव बाळकृष्ण गावस, युवराज सातार्डेकर, बाबुराव गवस व साची गावकर आदी होते.

सूत्रसंचालनातून मुलांनी आपली सरकारी प्राथमिक शाळा, मोठ्या शाळेपेक्षा किती चांगली आहे, हे लोकांना पटवून देण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका हेमा नरसे यांनी पाहुण्यांची ओळख शिक्षिका श्रुती पाटील यांनी तसेच आभार प्रदर्शन मंगलदास चिबडे यांनी केले.